ePaper
| वर्ष - 8 । अंक - 346 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™

# दम राहिला नाही, सगळी हवा गेली.., भुजबळांनी पुन्हा जरांगे पाटलांना डिवचले



## आतील पानांत

- साई सुदर्शनने संधीचं सोनं केलं!
- मराठमोळ्या आयुष म्हात्रेचं रौद्ररूप!
- पंतप्रधान मोदी ब्रिटनच्या दौऱ्यावर!
- व्याघ्र प्रकल्पात बांधकामास परवानगी


www.mahaenews.com । शुक्रवार, दि. 25 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### जगभरात सध्या सुरू असलेल्या युद्धांत आणखी एका संघर्षाची भर : आत्तापर्यंत 42 जण ठार

# थायलंड-कंबोडिया यांच्यात हिंदू मंदिरावरुन पेटले युद्ध!

### दोन्ही देशांमधील तणावात प्रचंड वाढ, थायलंडकडून कंबोडियाच्या लष्करी तळांवर जोरदार हल्ले !

। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**सध्या जगामध्ये अनेक ठिकाणी युद्धजन्य परिस्थिती आहे, त्यात आता भर पडली आहे, ती थायलंड आणि कंबोडिया या भारतात जवळच्या दोन देशांमधील युद्धाच्या ठिणगीमुळे ! त्यांच्यात सुरू असलेल्या हल्ल्यांमध्ये तसेच गोळीबारामध्ये बेचाळीस जण ठार झाल्याचे वृत्त आहे. मुख्य म्हणजे एका हिंदू मंदिराच्या वादातून हे युद्ध पेटण्याचे सांगण्यात येते. थायलंड अतिशय आक्रमक त्यांनी कंबोडियाच्या लष्करी तळांवर जोरदार हवे चढवले आहेत. जगातील सर्व मोठे देश हे युद्ध कसे थांबेल, यासाठी प्रयत्नशील आहेत.**



## भव्य दिव्य हिंदू मंदिर, उत्कृष्ट स्थापत्यशास्त्राचा नमुना

आंग्कोर वाट किंवा आंगकोर वट हे आंग्कोर, कंबोडिया येथील राजा सूर्यवर्मन दुसरा याच्या कारकीर्दीत बांधले गेलेले बाराव्या शतकातील हिंदू मंदिर आहे. अप्रतिम स्थापत्यशास्त्र आणि भव्य शिल्पकलांचा नमुना म्हणून ओळखले जाणारे आंग्कोरवाट हे मध्ययुगात 'व्रह विष्णूलोक', गृह विष्णूलोक' म्हणून ओळखले जाते. खमेर स्थापत्त्यशास्त्राचा उत्कृष्ट नमुना म्हणून सुस्थितीत असणारे आंग्कोरवाट ही एकमेव वास्तू आहे.

### सीमेवर प्रचंड तणाव...

थायलंड आणि कंबोडिया यांच्या सीमेवर नेहमीच तणाव असतो त्यात पुन्हा आता भर पडली असून तो पुन्हा एकदा वाढताना दिसत आहे. थायलंडने कंबोडियन लष्करी तळांवर हवाई हल्ले सुरू केले आहेत. यापूर्वी दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये सीमेजवळ गोळीबारही झाला. दोन्ही देश एकमेकांना धमक्या देत असताना गुरुवारी सकाळी अचानक युद्धालाच सुरुवात झाली.

### कंबोडियाचा आरोप

कंबोडियाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी थेट आरोप केला आहे, की थायलंडच्या सैनिकांनी प्रथम गोळीबार केला, त्याला प्रत्युत्तर म्हणून आमच्या सैन्याने जोरदार हल्ला चढवला. दुसरीकडे थायलंडच्या प्रवक्त्याने म्हटले आहे, की सीमेवर सैन्य पाठवण्यापूर्वी कंबोडियाने ड्रोन तैनात केले होते. यानंतर तोफ आणि लांब पल्ल्याच्या BM21 बीएम - २१ या रॉकेटने आमच्यावर हल्ले चढवले.

### संघर्षाचे कारण जुने शिवमंदिर..

या संदर्भात आणि युद्धाच्या पार्श्वभूमीबाबत कानोसा घेतला तर लक्षात येते, की दोन्ही देशांमधील या संघर्षाचे कारण आहे ११०० वर्षांपूर्वीचे जुने शिवमंदिर ! प्रत्यक्षात हे शिवमंदिर 'प्रीह विहियर' म्हणूनही ओळखले जाते, असे तेथील नागरिकांनी सांगितले.

### नवव्या शतकातील मंदिर

हे शिवमंदिर नवव्या शतकात खमेर सम्राट सूर्यवर्मन यांनी भगवान श्री शिवशंकरांची पूजाअर्चा करण्यासाठी बांधले होते. मात्र, आता हे मंदिर केवळ श्रद्धेचे केंद्र राहिलेले नाही, तर राष्ट्रवाद, राजकारण आणि लष्करी शक्तीचा अखाडा बनले आहे आणि दोन्ही देशांमध्ये संघर्षास तेच कारणीभूत ठरले असल्याचे दोन्ही राष्ट्रांकडून जाहीर करण्यात आले आहे.

### काय आहे दोन्ही देशांचा दावा?

या शिवमंदिराच्या संदर्भात कंबोडियाचा दावा आहे, की हे मंदिर त्यांच्या सीमेत आहे, तर थायलंडचे म्हणणे आहे, की, मंदिराचा काही भाग त्यांच्या सुरिन प्रांतात येतो. या दोन्ही देशांमध्ये श्री शिवाचे लाखो भक्त आहे आणि मंदिरात दर्शनास जाण्यासाठी नेहमीच त्यांना संघर्ष करावा लागतो.

### डांगरेक टेकड्यांमध्ये स्थित

खरे तर, हे मंदिर डांगरेक टेकड्यांमधील एका मोक्याच्या खिंडीवर आहे, जिथून एकेकाळी ऐतिहासिक खमेर महामार्ग जात होता, जो आजच्या अंगकोरला (कंबोडिया) आणि फिमाई (थायलंड) ला जोडत होता. पण, या दोन्ही देशांना इतिहास मान्य नाही. त्या मंदिरावर ताबा घेण्यासाठी नेहमीच चकमकी होत असतात आणि आता तर युद्धाला सुरुवात झाली आहे.

### वादाचे कारण काय?

या वादाची सुरुवात विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून झाल्याचे संदर्भ आढळतात. १९०४ मध्ये, नैसर्गिक पाण्याच्या विभाजनाच्या आधारावर सीमा तयार होईल, असे निश्चित करण्यात आले होते. तथापि, दोघांच्याही आडमुठ्या धोरणामुळे ते शक्य झाले नाही. मात्र, १९०७ मध्ये फ्रेंच वसाहतवाद्यांनी तयार केलेल्या नकाशात, मंदिर कंबोडियामध्ये दाखवण्यात आले होते. थायलंडने तेव्हा ते स्वीकारले. परंतु, १९३० च्या दशकात याला विरोध केल्याचा उल्लेख आहे. मात्र, आयसीजेने (आंतरराष्ट्रीय न्यायालय) हा विरोध नाकारला होता, अशी देखील नोंद आहे.

### कंबोडियाकडे अधिकार

दरम्यान, १९६२ मध्ये, आंतरराष्ट्रीय न्यायालयाने (आयसीजे) महत्त्वपूर्ण निर्णय देऊन कंबोडियाला मंदिरावरील अधिकार दिले. तथापि, थायलंडने कधीही हा निर्णय पूर्णपणे स्वीकारला नाही आणि अद्यापही मंदिरालगतच्या जागेवर त्यांचा दावा कायम आहे.

### वर्षानुवर्षे लढा सुरुच..

या मंदिरावर दावा सांगितल्यानंतर या दोन देशांमध्ये वर्षानुवर्ष संघर्ष सुरूच आहे. २००८ मध्ये कंबोडियाने जेव्हा 'युनेस्को' च्या जागतिक वारसा स्थळात मंदिराचा समावेश केला, तेव्हा दोन्ही देशांमधील तणाव आणखी वाढला. २००८ ते २०११ दरम्यान, मंदिराच्या परिसरावरून, मंदिराच्या ताब्यावरून दोन्ही देशांमध्ये पुन्हा अनेकदा संघर्ष झाले.

### आठवडाभर युद्ध..

त्यानंतर हा वाद एवढा पेटला की दोन्ही देशांनी मंदिरावर ताबा सांगितला आणि युद्धाची तयारी केली. त्यांनी कोणाच्याही मध्यस्थीचा स्वीकार करायचा नाही असे जाहीर केले. २०११ मध्ये, दोन्ही देशांत एका आठवडाभर जोरदार गोळीबार सुरू होता. यात दोन्ही देशांतील कित्येक निष्पाप नागरिक मारले गेले होते. यात कंबोडियाचे १९ सैनिक आणि तीन नागरिक तर थायलंडचे १६ सैनिक आणि चार नागरिकांचा समावेश आहे.

### 5 हजार किलोमीटर दूर

भारताच्या सीमेपासून पाच हजार किलोमीटर अंतरावर हे मंदिर असून एक अद्भुत कलाकृती म्हणून पाहण्यासाठी जगभरातून हजारो पर्यटक त्या ठिकाणी येतात आणि नतमस्तक होतात. सध्या त्याचा ताबा कुणाकडे म्हणून संघर्ष सुरू आहे.

# हिंजवडी आयटी पार्कमधील कोंडी फुटणार!

## प्रायोगिक उपाययोजना : पोलीस आयुक्त चौबे यांची पाहणी, महत्त्वपूर्ण सूचना

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राजीव गांधी आयटी पार्क, हिंजवडी परिसरातील वाढती वाहतूक कोंडी आणि त्यामुळे निर्माण होणारे त्रास लक्षात घेऊन वाहतुकीचे योग्य नियोजन करण्यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी गुरुवारी हिंजवडीतील प्रमुख रस्त्यांची पाहणी केली. या पाहणीदरम्यान वाहतूक सुरळीत करण्यासाठी विविध उपाययोजना सुचवण्यात आल्या असून, काही उपाय प्रायोगिक तत्त्वावर पुढील महिनाभर अंमलात आणले जाणार आहेत.**



या पाहणीमध्ये सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अपर आयुक्त सारंग आवाड, पीएमआरडीएचे अपर आयुक्त दीपक सिंगला, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील, पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड, सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील कुराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालाजी पांढरे, 'अनक्लॉग हिंजवडी आयटी पार्क' मोहिमेचे संयोजक सचिन गुणाले आणि सचिन लोंढे यांच्यासह एमआयडीसी, महावितरण व पीएमपीएमएलचे अधिकारी उपस्थित होते.

वाहतूक सुधारण्यासाठी महत्त्वाच्या सूचना विरुद्ध दिशेने सुरू असलेली वाहतूक बंद करून त्या रस्त्यांवर बॅरिकेड्स लावण्याचे आदेश.

काही प्रमुख चौकांमध्ये एकेरी वाहतुकीचा पर्याय राबवण्याचा विचार.

प्रायोगिक तत्त्वावर वाहतूक वळविण्याचे प्रयोग एक महिन्यासाठी राबवण्याची सूचना. जांभूळकर चौक व इंडियन ऑईल पेट्रोल पंप चौकातील सर्कल अर्धे करून वाहतूक प्रवाह सुलभ करण्याचे आदेश.

शेल पेट्रोल पंप चौकातून विरुद्ध दिशेने होणारी वाहतूक बंद.

माइंड ट्री चौक, डॉलर कंपनी परिसर, एमआयडीसी सर्कल आणि मेगा पोलीस सर्कल या ठिकाणीही वाहतुकीसंदर्भात उपाय सुचवले. सेवा रस्त्यांवरील अडथळे दूर करण्यावर भर हिंजवडी वाहतूक विभागाच्या कार्यालयाजवळील सेवारस्त्यालगत महावितरण कंपनीचे रोहित्र (डीपी) हटवण्याच्या सूचना देण्यात आल्या, जेणेकरून फ्री लेफ्ट टर्न अधिक सुलभ होईल. तसेच, पांडवनगर परिसरातील उर्वरित अतिक्रमण त्वरित हटविण्याचे आदेशही देण्यात आले.

### 'अनक्लॉग हिंजवडी आयटी पार्क' मोहिमेची पुढाकार

हिंजवडीतील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी 'अनक्लॉग' मोहिमेंतर्गत एक ५७ पानी अहवाल तयार करण्यात आला आहे. या अहवालात जिओ टॅगिंगसह समस्याग्रस्त ठिकाणांची माहिती आणि उपाययोजना नमूद करण्यात आल्या आहेत. पोलिस आयुक्तांना हा अहवाल हिंजवडी पोलीस ठाण्यात सादर करण्यात आला.

मोहिमेचे संयोजक सचिन लोंढे यांनी सांगितले की, "या सर्व उपाययोजनांचा परिणाम पुढील तीन ते चार महिन्यांत दिसू लागेल. काही ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर वाहतूक वळविणे सुरू होत आहे, त्यावर नागरिकांनी सहकार्य करावे." हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूक कोंडीमुळे नागरिक, कर्मचाऱ्यांना होत असलेला त्रास लक्षात घेता प्रशासनाने घेतलेला हा पुढाकार महत्त्वाचा आहे. योग्य नियोजन, मार्गदर्शन व सर्व यंत्रणांमध्ये समन्वय राहिल्यास लवकरच वाहतूक कोंडीपासून दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

---

# पुण्याहून कोकणासाठी धावणार १२ स्पेशल ट्रेन्स

## गणेशभक्तांसाठी आनंदवार्ता! ; गणेशोत्सवासाठी रेल्वे विभागाचे खास नियोजन

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**गणेशोत्सवासाठी आपल्या मूळगावी कोकणात जाणाऱ्या पुण्यातील गणेशभक्तांसाठी दिलासादायक बातमी आहे. पुणे रेल्वे विभागाने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर १२ विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कोकणवासीयांना गणपतीसाठी आपल्या घरी जाणे अधिक सुलभ होणार आहे. या विशेष गाड्यांचे आरक्षण २४ जुलैपासून सुरू झाले आहे.**



गणेशोत्सव हा कोकणात अत्यंत उत्साहात साजरा केला जातो. पुण्यात नोकरी, व्यवसायासाठी स्थायिक झालेल्या कोकणवासीयांची या काळात आपल्या गावी जाण्यासाठी मोठी गर्दी होते. ही गरज लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने या विशेष गाड्यांचे नियोजन केले आहे.

पुणे-रत्नागिरी साप्ताहिक विशेष गाड्यांचे वेळापत्रक

१. पुणे-रत्नागिरी सामान्य साप्ताहिक विशेष (६ फेऱ्या)
गाडी क्र. ०१४४७ : शनिवार दिनांक २३, ३० ऑगस्ट व ६ सप्टेंबर रोजी
पुणे प्रस्थान : रात्री १२.२५
रत्नागिरी आगमन : सकाळी ११.५०
गाडी क्र.०१४८८ : शनिवार दिनांक २३, ३० ऑगस्ट व ६ सप्टेंबर रोजी
रत्नागिरी प्रस्थान : दुपारी ५.५०
पुणे आगमन : पहाटे ५.००

२. पुणे-रत्नागिरी वातानुकूलित साप्ताहिक विशेष (६ फेऱ्या)
गाडी क्र. ०१४४५ : मंगळवार दिनांक २६ ऑगस्ट, २ व ९ सप्टेंबर
पुणे प्रस्थान : रात्री १२.२५
रत्नागिरी आगमन : सकाळी ११.५०
गाडी क्र. ०१४४६ : मंगळवार दिनांक २६ ऑगस्ट, २ व ९ सप्टेंबर
रत्नागिरी प्रस्थान : दुपारी ५.५०
पुणे आगमन : पहाटे ५.००

**प्रमुख थांबे :**
या दोन्ही गाड्यांना चिंचवड, तळेगाव, लोणावळा, कल्याण, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, करंजडी, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड आणि संगमेश्वर रोड या स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे.

मुंबई-पुणे मार्गावर एकूण २५० गणपती विशेष गाड्या मध्य रेल्वेने यंदा मुंबई आणि पुण्याहून कोकणासाठी एकूण २५० गणपती विशेष फेऱ्या जाहीर केल्या आहेत. मुंबईहून सीएसएमटी आणि एलटीटी येथून रत्नागिरी, सावंतवाडी, मडगावकडे गाड्या धावतील, तर पुण्याहूनही रत्नागिरीसाठी वेगवेगळ्या मार्गांवर विशेष गाड्या उपलब्ध असतील.

आरक्षण आजपासून सुरू या विशेष गाड्यांचे आरक्षण २४ जुलैपासून सुरू झाले आहे. मध्य रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा NTES मोबाइल ॲपवरून गाड्यांचे वेळापत्रक, थांबे आणि इतर तपशील पाहता येतील.

### गणपती घरी... आणि रेल्वेची सोयही तयार!

रेल्वे प्रशासनाच्या या नियोजनामुळे कोकणातील लाखो भाविकांना गणपतीसाठी आपल्या घरी जाणे सुलभ होणार असून, उत्सवाचा आनंद द्विगुणित होणार आहे. लवकरात लवकर आरक्षण करून आपल्या प्रवासाची तयारी सुरू करा!

## महापालिका कठोर कारवाई करणार

# महापालिकेच्या सर्वेक्षणात आढळले 34 हजार करबुडवे!

### 34 हजार मालमत्ता धारकांनी एकदाही कर भरला नाही

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड: शहरात ज्या निवासी किंवा बिगरनिवासी मालमत्ताधारकांकडे थकबाकी आहे, अशा मालमत्ताधारकांवर महापालिका कठोर कारवाई करण्यास सुरुवात करणार आहे. शहरात ७ लाख ३१ हजार मिळकतींची नोंद आहे. त्यापैकी आतापर्यंत ४ लाख २६ हजार मालमत्ताधारकांनी चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा केला आहे. तसेच, आतापर्यंत एकदाही मालमत्ता कर न भरलेली ३४ हजार २२ इतकी संख्या असून, अशा मालमत्ताधारकांवर महापालिका कठोर कारवाईस सुरुवात करणार असल्याचे कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.**




महापालिकेने पहिल्या तिमाहीत ५२२ कोटींचे कर वसूल करून विक्रम केला आहे. चालू आर्थिक वर्षात कर संकलन विभागाने १३०० कोटींचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी महापालिकेच्या १८ विभागीय कार्यालयांमार्फत कर संकलनाचे कामकाज सुरू आहे.

मालमत्ता बिलासोबत थकबाकीदारांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. नोटीस देऊनही वारंवार मालमत्ता कर भरण्यास टाळाटाळ करणाऱ्यांवर महापालिकेने कठोर पावलं उचलली आहेत. कर न भरल्यास मालमत्ताही जप्त करण्याचे उद्दिष्ट असल्याचे कर संकलन विभागाने स्पष्ट केले आहे.

तात्काळ कर न भरल्यास कारवाई अटळ असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. शहरातील थकीत १ लाख १२ हजार ८०९ निवासी मालमत्ताधारकांकडे ३१० कोटींचा थकीत कर आहे. ज्या निवासी मालमत्ताधारकांकडे ५ किंवा १० वर्षांपेक्षा अधिक काळापासून थकबाकी आहे, अशा निवासी मालमत्तांची जंगम मालमत्ता म्हणजे कार, टीव्ही, फ्रिज व घरातील महागड्या वस्तू जप्त करण्याची कारवाई महापालिकेच्या कर संकलन विभागाच्या मार्फत करण्यात येणार आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन मोहिमेस नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. मात्र अद्यापही काही मालमत्ताधारकांनी एकदाही मालमत्ता कर भरलेला नाही. अशा थकबाकीदारांवर आता कठोर कारवाई केली जाणार आहे. ५ किंवा १० वर्षांपेक्षा अधिक काळ थकबाकी असलेल्या मालमत्तांधारकांवर कारवाई सुरू करण्यात येणार आहे. मालमत्ता कर न भरल्यास मालमत्ताही जप्ती करण्याची कारवाई अटळ आहे.
> **-प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

> पिंपरी चिंचवड महापालिकेने चालू आर्थिक वर्षासाठी १३०० कोटींचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यासाठी विभागीय कार्यालयांमार्फत युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. नागरिकांनी ऑनलाइन कर भरणा करून ४ टक्के सवलतीचा लाभ घ्यावा. मोबाईलवरून सहज कर भरता येतो, त्यामुळे प्रत्येकाने आपला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी मालमत्ता बिलाशी जोडावा, जेणेकरून सर्व सुविधा घरबसल्या मिळू शकतील.
> **- अविनाश शिंदे,** सहाय्यक आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

---

## २० वर्षांहून जुन्या १७ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट

### इंद्रायणी नदीवरील कुंडमळा येथील पूल दुर्घटना झाल्यानंतर महापालिकेचा निर्णय

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड शहरातील विविध भागात रेल्वे मार्ग, नदी, चौक आणि महामार्गावर वाहतुकीच्या सोईसाठी ४६ ठिकाणी पूल आणि उड्डाणपूल उभारले असून यामध्ये २० वर्षांहून अधिक आयुर्मान झालेल्या १७ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट (संरचनात्मक लेखापरीक्षण) करण्यात येणार आहे. जूनमध्ये इंद्रायणी नदीवरील कुंडमळा येथील पूल दुर्घटना झाल्यानंतर महापालिका प्रशासनाने पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा निर्णय घेतला आहे.**



पिंपरी-चिंचवड शहर १८१ चौरस किलोमीटर क्षेत्रफळावर वसले आहे. शहराच्या चहूबाजूस ये-जा करण्यासाठी तसेच सुरळीत रहदारीसाठी महापालिकेने प्रशस्त रस्त्यांसोबत पवना, मुळा, इंद्रायणी नदी, रेल्वे मार्ग आणि रस्त्यांवर, चौकात उड्डाणपूल बांधण्यास सुरुवात केली. २००४ मध्ये महापालिकेने निगडी, टिळक चौकातील कै. महापौर मधुकर पवळे हा पहिला उड्डाणपूल उभारला. शहरातील विविध भागात ४६ पूल उभारले आहेत. यामधील २९ पूल हे २० वर्षांपेक्षा कमी कालावधीचे आहेत. १७ पुलांचे २० वर्षांहून अधिक आयुर्मान झाले आहे. दुसरीकडे महापालिकेने यापूर्वीच दापोडीतील पुण्याकडून पिंपरी-चिंचवडकडे येताना हॅरिस ब्रिज इंग्रजांच्या काळात म्हणजे १८९५ मध्ये, तर त्याच ठिकाणी समांतर पूल पुणे महापालिकेने १९८७ मध्ये उभारला होता.


वाहतुकीचा ताण वाढत असल्याने पिंपरी-चिंचवड महापालिकेने २०१९ मध्ये समांतर पूल उभारला. चिंचवडमधील रेल्वे पूल १९७८ मध्ये तर पिंपरीतील इंदिरा गांधी उड्डाणपूल १९८३ मध्ये उभारला आहे. हॅरिस ब्रिज, पिंपरी आणि चिंचवड अशा तिन्ही पुलांचे महापालिकेने स्ट्रक्चरल ऑडिट केले आहे. ऑडिटनुसार पुलांची दुरुस्ती करून वाहतूक सुरू करण्यात आली आहे. आता फक्त १७पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे. त्यासाठी सल्लागाराची नेमणूक करून निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही सुरू असल्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाला प्रशासनाने कळविले आहे.

#### शहरातील पूल, उड्डाणपूल

नाशिक फाटा येथील भारतरत्न जेआरडी टाटा दुमजली उड्डाणपूल, निगडीतील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकातील दुमजली उड्डाणपूल, भोसरी, चिंचवडगाव, थेरगावातील डांगे चौक येथील उड्डाणपूल हे शहरातील मोठे पूल आहेत. पिंपरीगाव-पिंपळे सौदागर (दोन पूल), दापोडी-फुगेवाडी, दापोडी-बोपोडी, दापोडी-सांगवी, बोपखेल-खडकी, सांगवी-स्पायसर महाविद्यालय, सांगवी-पुणे विद्यापीठ, निगडीतील टिळक चौक, भोसरी, स्पाईन रस्ता, चिंचवड गावातील मोरया मंदिराशेजारी, चिंचवडगाव ते बिर्ला रुग्णालय, चिंचवड स्टेशन (दोन पूल), चिंचवड येथील मदर टेरेसा उड्डाण पूल, बिजलीनगर, थेरगावातील डांगे चौक, वाकड-हिंजवडी, निगडी-रावेत, सांगवी फाटा-औंध, तळवडे-निघोजे, कासारवाडी-पिंपळे गुरव, दापोडी-पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर-जगताप डेअरी, काळेवाडी फाटा, कुदळवाडी उड्डाणपूल यांसह शहरात ४६ उड्डाणपूल आहेत, तर पिंपरीतील मिलिटरी डेअरी फार्म, चिंचवडगावातील बटरफ्लाय, पिंपळे निलख-बाणेर येथील पुलाचे काम सुरू आहे.

> शहरात रेल्वे मार्ग, नदी, चौक आणि महामार्गावर ४६ ठिकाणी पूल आणि उड्डाणपूल आहेत. यामधील २९ पुलांचे आयुर्मान २० वर्षांच्या आतील आहे, तर १७ पुलांचे आयुर्मान २० वर्षांपेक्षा अधिक आहे. या १७ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे. त्यासाठीची कार्यवाही सुरू केली आहे.
> **-मकरंद निकम,** शहर अभियंता, महापालिका

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



### सद्गुरूला शरण जावे.

प्रत्येकजण पोटाला खायला मिळावे म्हणून खटपट करीत असतो. परंतु आपल्या इच्छेप्रमाणे आपल्याला मिळते का ? नाही. म्हणून, सांगायचे कारण असे की, जर आपण विषयांकरिता इतके झटतो, तर देवाच्या प्राप्तीकरता श्रम करायला नकोत का ? संत सांगतात तो मार्ग चोखाळून पाहावा. एकदा ठाम विचार करून आपण ज्याला गुरू कल्पिला, तो सांगेल तेच साधन मानावे. गुरू देहातच असावा हे मानणे चूक आहे. गुरू हे देहात कधीच नसतात. गुरू प्रत्यक्ष देवच आहे अशी भावना ठेवून वागले पाहिजे. अशी भावना ठेवून वागले, म्हणजे गुरू कसाही असला तरी तिथे प्रत्यक्ष देवाला येणे भाग पडते. गुरू सांगेल तसे आपण नेहमी साधन करीत राहावे. तसे साधन करीत राहिले म्हणजे आपल्याला देवाची प्राप्ती होते. गुरू नामाशिवाय दुसरे काय सांगणार ? त्यातच आपण सदा राहावे. जो खरा साधनात राहतो, त्याला ह्या सर्व गोष्टी आपोआपच साधत असतात. म्हणून आपण गुरूला अनन्य शरण जाऊन, तोच सर्व करतो आहे हे मानून, जे होईल त्यात आनंद मानीत जावा. भगवंताबद्दल जिज्ञासा उत्पन्न होणे ही खरी भाग्याची गोष्ट आहे. असा जिज्ञासू शिष्य भेटला तर गुरूला देखील आपले स्वतःचे सार्थक झाले असे वाटते. श्रीरामचंद्राची जिज्ञासू अवस्था पाहून वसिष्ठांना फार आनंद वाटला; आणि ते साहजिकच आहे. संतांनी एकच देव, एकच साधन, आणि एकच गुरू मानला, त्याचप्रमाणे, आपण एका नामात राहण्याचा प्रयत्न करावा. मुलगा हसतखेळत असताना बाप त्याला घेतो, पण रडू लागला की खाली ठेवतो; याच्या उलट, मुलगा रडत असला तर आई त्याला घेते. हाच देवामध्ये आणि संतामध्ये फरक आहे.

बर्फामधले पाणी काढले तर काहीच उरत नाही. त्याप्रमाणे, संतांमधले भगवंताचे प्रेम जर काढून टाकले तर त्यांच्यामध्ये मग काही उरतच नाही. साधन करण्याचे कष्ट न होता वस्तू साध्य करून घेण्याचा मार्ग म्हणजे सत्संगती हा होय. आपल्या मनावर संगतीचा फार परिणाम होतो. नुसता हेतू काम करीत नसून संगत काम करीत असते. संगत दोन प्रकारची आहे; घातक आणि उत्तम. विषयी माणसाची संगत ही घातक होय, आणि सत्संगत ही उत्तम होय. सत्संगतीमध्ये असताना, आपल्या ठिकाणी दोष आहे असे ज्याला कळेल तो लवकर सुधारेल. आपण ज्या सत्पुरुषाकडे जातो त्याने सांगितलेले मनापासून आचरणामध्ये आणण्याचा प्रयत्न केला, तरच त्याच्याशी खरी संगत केली असे म्हणावे. संताची प्रचीती पाहणे म्हणजे आपले प्रपंचातले काम मनासारखे होणे हे नव्हे. ज्या घटकेला आपले चित्त शुद्ध होते, त्या घटकेला संताची खरी प्रचीती आली असे समजावे.

**बोधवचन:- संतांना ओळखण्यासाठी अनुसंधानाशिवाय दुसरे साधन नाही.**



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# अरे, काय चाललंय काय..
# महाराष्ट्र विकताय काय ?

**गेले महिनाभर महाराष्ट्रात सर्वपक्षीय राजकारण्यांचे नेमके चालले आहे काय? हेच समजेनासे झाले आहे. सगळ्यांनी मिळून राज्याची प्रचंड बदनामी करायची आणि एक दिवस महाराष्ट्र कोणाला तरी विकून टाकायचा, असे ठरवले आहे की काय, अशी शंका येते. पण जे काही चालले आहे, ते अत्यंत वाईट आहे, हे या टाकाऊ राजकारण्यांना कोण सांगणार ?**



### गेल्या पंधरा दिवसातील बातम्या पाहा..

एका आमदाराचा भाऊ नाचणाऱ्या मुलीवर गोळीबार करतो..एक आमदार मारामारीचे करारपत्र तयार करून माजी खासदाराला आता कोण राहतोय, असे धमकावतो. त्याआधी विधानसभेच्या कॅन्टीन मधील कामगारांना बॉक्सिंग स्टाईल मारतो..कृषीमंत्री तर रोज बडबडीचे नवनवीन विक्रम करत आहेत..गृह राज्यमंत्र्याचा डान्स बार निघतो.. त्याची नोंद देखील आपल्याच आईच्या नावाने.. आमदारांच्या अंदाज समितीचा मुक्काम असलेल्या विश्रामगृहात कोट्यवधी रुपये रोख सापडतात.. बीड मधील खून प्रकरणातील माजी मंत्र्याचे समर्थक सापडत नाहीत..विधिमंडळाच्या पोर्चमध्येच आमदारांच्या समर्थकांमध्ये तुंबळ हाणामारी होते..विधीमंडळ आवारात एक आमदार दुसऱ्याला शिव्या देतो.. सत्ताधारी पक्षाच्या प्रदेश युवा शाखेचा अध्यक्ष एखाद्या गुंडा प्रमाणे दे दणादण मारहाण करतोय, ती देखील एका सामाजिक संघटनेच्या अध्यक्षाला..आता हनी ट्रॅप, रमी ट्रॅप यांच्या चर्चा जोरात आहेत. शिवाय आणखी बरंच काही.! अरे, काय चालले आहे महाराष्ट्रात ?

### काय चाललंय राव..

टीव्हीवरील मालिकेत एका भागाचे शीर्षक वाचलेले आठवते.. ते होते, काय चाललंय राव? आज एकूणच राजकारणाची परिस्थिती पाहता हे वाक्य सर्वसामान्य जनता नक्कीच म्हणत असेल. राज्याचे राजकारण आणि देशाचे राजकारण हातात हात घालून वाटचाल करत आहेत. विरोधक शक्तीपात झालेले आहेत. सत्ताधारी सर्वशक्तिमान झाल्याच्या अविर्भावात आहेत. सर्वसामान्यांच्या मूलभूत समस्या कायम आहेत. त्यावर ना विरोधक ,ना सत्तारूढ तोडगा काढत आहेत. केवळ जनतेच्या तोंडावर आकडेवारी आणि विकासाच्या संकल्पना आभासी दुनियेतून दाखवत आहेत, ज्याच्याशी सर्वसाधारण जनतेचे किंवा गोरगरिबांचे काही देणे घेणे नाही!

### संसदेत तरी काय?

संसदेचे अधिवेशन सुरु होऊन चार-पाच दिवस झाले, मात्र या दिवसात कामकाज काय, किती आणि कसे झाले, याचे विवेचन करायला सांगितले तर जनतेच्या हाताला मोठा भोपळा लागेल. या कालावधीत केवळ गोंधळ!

### सभागृह तहकूब करण्यासाठीच..

सभागृह तहकूब करण्यासाठी भरवले गेले का, असा प्रश्न निर्माण होतो. विरोधी पक्ष नेते राहुल गांधी सिंदुरच्या मुद्द्यवर अडकलेले आहेत, ते बरोबर आहे. उत्तरे मिळायलाच पाहिजेत. मात्र, आजवर जी उत्तरे मिळाली, त्यावर अविश्वास दाखवणे आणि राहुल गांधी यांचे म्हणणे आहे, त्याला पंतप्रधान मोदी यांनी होकारार्थी उत्तर देणे हे होणार नाही. मुळात पंतप्रधान मोदी यांनी आजवर एकही पत्रकार परिषद घेतली नाही, याचे कारण त्यांनाच माहीत! विरोधकांच्या दृष्टीने ते त्यांना नको त्या प्रश्नांना उत्तरे द्यायला घाबरतात.मात्र, आता अकरा वर्षे पंतप्रधानपदावर असलेली व्यक्ती आता प्रश्न आणि उत्तरांची फारशी काळजी करेल, असे वाटत नाही. पण तरीही त्यांनी माध्यमांशी संवाद न साधणे उचित म्हणता येणार नाही, हे मान्य करायला हवे!

### संसदेत उत्तर देणे म्हणजे प्रचार करणे..

संसदेत हजेरी कमीत कमी लावणे आणि उत्तर देताना प्रचाराचे, प्रचारकी भाषण देणे, हे पण आत थांबवले पाहिजे आणि विरोधकांनीही त्यांना उत्तर देण्यासाठी उद्युक्त केले पाहिजे. अभ्यासपूर्ण, विचारपूर्ण प्रश्न, भाषणे सभागृहात करावीत, केवळ उणीदुणी, वैयक्तिक रागलोभ व्यक्त करण्याचे सभागृह हे ठिकाण होऊ नये आणि अधिवेशन संपल्यानंतर जनतेने सुद्धा काय चाललंय राव, असे म्हणू नये!

### राज्यात गोंधळाची परिस्थिती..

दुसरीकडे आपल्या महाराष्ट्राची परिस्थिती जनता आणि पक्षाचे कट्टर कार्यकर्ते यांना गोंधळात टाकणारी आहे. कोण कोणाचे प्रतिस्पर्धी आहे आणि कोण कोणाचे मित्र किंवा समर्थक आहेत, याचा थांगपत्ता लागेनासा झाला आहे. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या मोबाईलची चित्रफीत कोणी काढली ? कोणी विरोधकांना पुरवली ? का पुरवली ? कशी पुरवली ? कधी पुरवली ? हे पाहणे आवश्यक आहे. कोकाटे यांचे वर्तन समर्थन करणारे अजिबाबतच नाही. ते सभागृहात इतके बेफिकीर वागत असतील, तर त्यांच्यावर कारवाई व्हायलाच पाहिजे. मात्र, सभागृहाचे नियम, कायदे किंवा दाद मागण्याची मर्यादा पायदळी तुडवणाऱ्या व्यक्तीवरही कारवाई व्हायलाच पाहिजे.

### थेट समाज माध्यमांकडे धाव..

थेट समाज माध्यमांवर जाऊन विद्वत्तेचा आव आणणारे शहाणे समजायचे का ? दुसरे असे की नैतिकतेचे अधःपतन इतके झाले आहे, की पत्नी, आईच्या नावावर बियर बार किंवा मद्यालय परवाने काढण्यात धन्यता वाटणारे मंत्री आहेत, हे दुर्दैव! ज्येष्ठ नेते रामदास कदम, त्यांचे चिरंजीव गृह राज्यमंत्री योगेश काहीही कायदेशीर कागदपत्रे सादर करीत, कायच्याच्या कचाट्यातूनही सुटोत, पण, पत्नी, आईच्या नावाने डान्स बारचा परवाना काढताना शाळा, महाविद्यालय , ग्रंथालय, वृद्धाश्रम , विद्यार्थी वसतीगृह काढून त्याचे नाव 'सावली' द्यावेसे वाटले नाही का? हे त्यांना विचारायला हवे! आणि परवाना म्हणे तीस वर्षे पूर्वीचा आहे, म्हणजे त्यावेळीही हे कदम महाशय सत्तेतच असले पाहिजेत. सत्तेचा इतका चांगला उपयोग राजकारणीच करू जाणे !

### 'सावली' त बौद्धिकासाठी जायचे का?

त्यावेळी, त्यानंतर उद्धव ठाकरे आणि अनिल परब आणि अन्य शिवसैनिक शिवसेनेच्या बौद्धिकासाठी 'सावली' त जात होते की कदमांच्या पिढीत कोणी मंत्री झाले की त्यावर तोफ डागण्यासाठी दबा धरून बसली होती ? एकूणच नीतिमत्तेच्या दृष्टीने ही मंडळी रसातळाच्याही खाली गेली आहेत. महाराष्ट्राच्या या हास्य जत्रेकडे जनता केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम म्हणून पहात आहे.. ना सत्ताधाऱ्यांना गांभीर्य आहे, ना विरोधकांना ! अरे हे चाललंय काय, एवढेच विचारणे आपल्या हातात आहे, हे मात्र नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आता विजेती भारतीयच!

## महिला बुद्धिबळ विश्वचषक : दिव्यापाठोपाठ कोनेरू हम्पीही अंतिम फेरीत

। बतुमी (जॉर्जिया) ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय बुद्धिबळाच्या इतिहासात आजचा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल! दिव्या देशमुखच्या ऐतिहासिक कामगिरीनंतर अनुभवी कोनेरू हम्पी हिनेसुद्धा महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेची अंतिम फेरी गाठली असून, प्रथमच ही स्पर्धा जिंकणारी खेळाडू भारतीयच असणार आहे, हे आता निश्चित झाले आहे. भारताच्या या दुहेरी यशामुळे जागतिक बुद्धिबळ वर्तुळात भारताचा दबदबा पुन्हा अधोरेखित झाला आहे..**



भारत विरुद्ध चीन : उपांत्य फेरीत दोन निर्णायक विजय महिला विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत भारत विरुद्ध चीन असे रंगलेले द्वंद्व एकतर्फी ठरले.

दिव्या देशमुख हिने माजी जागतिक विजेती टॅन झोंगयीचा पारंपरिक डावात पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली.

तर कोनेरू हम्पीला आपला अनुभव पणाला लावत, दीर्घ आणि चुरशीच्या लढतीत माजी 'कॅंडिडेट्स' विजेती ली टिंगजी हिच्यावर ५-३ अशी रोमांचक बाजी मारावी लागली.

**हम्पीची संघर्षपूर्ण चढाई:** कोनेरू हम्पी आणि ली टिंगजी यांच्यातील लढत ही स्पर्धेतील सर्वात उत्कंठावर्धक ठरली.

**पारंपरिक दोन डावे बरोबरीत सुटले.** १५-१५ मिनिटांच्या टायब्रेकर डावांनंतरही कोणतीही खेळाडू विजयी ठरली नाही. १०-१० मिनिटांच्या डावात टिंगजीने एक डाव जिंकत आघाडी घेतली. त्यामुळे हम्पीसाठी पुढील डाव 'करो अथवा मरो' होता. मात्र दडपणाखालीही हम्पीने शिस्तबद्ध आणि आक्रमक खेळ करत बरोबरी साधली – स्कोअर झाला ३-३.

त्यानंतर निर्णायक 'अतिजलद' (ब्लिट्झ) टायब्रेकर मध्ये हम्पीने तिचा सर्वोत्तम खेळ सादर केला. पहिल्या डावात पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळताना टिंगजीला पराभूत करत वर्चस्व प्रस्थापित केले. दुसऱ्या डावात इटालियन ओपनिंग वापरत, घातक आणि तांत्रिक चालांनी टिंगजीला चकवले आणि अंतिम फेरीची जागा पक्की केली.

इतिहासाच्या उंबरठ्यावर भारतीय महिला बुद्धिबळ

भारताच्या ३८ वर्षीय ग्रँडमास्टर कोनेरू हम्पी हिला जलद प्रकारात दोन वेळा जगज्जेतेपद मिळवले आहे. मात्र विश्वचषकाच्या क्लासिकल प्रकारात हा तिला मिळणारा पहिलाच अंतिम फेरीतील प्रवेश आहे. दुसरीकडे, १९ वर्षीय दिव्या देशमुख हिने अवघ्या काही वर्षांत आपल्या सुस्पष्ट शैलीने जागतिक बुद्धिबळात वेगाने प्रगती केली आहे. या दोन पिढ्यांतील खेळाडूंच्या अंतिम सामन्यामुळे भारतीय बुद्धिबळाचे वैभव नवे शिखर गाठणार आहे.

**'कॅंडिडेट्स' स्पर्धेची तिकीटही निश्चित**

दिव्या आणि हम्पी दोघींनी अंतिम फेरी गाठल्यामुळे २०२५ मधील 'कॅंडिडेट्स' स्पर्धेतील स्थान निश्चित झाले आहे. त्या स्पर्धेचा विजेता, विद्यमान विश्वविजेती जू वेनजून हिला आव्हान देणार आहे.

### नवीन युगाची सुरुवात

भारतीय महिला बुद्धिबळ आता फक्त जागतिक पातळीवर उपस्थिती नोंदवत नाही, तर आघाडी घेताना दिसते आहे. दिव्या देशमुख आणि कोनेरू हम्पी यांच्या लढतीमुळे भारतीय बुद्धिबळ प्रेमींना एक ऐतिहासिक अंतिम फेरी पाहण्याची संधी मिळणार आहे.

---

# ऋषभ पंतचे धाडसी 'पाऊल'!

## पायाला फ्रॅक्चर, सहा आठवडे विश्रांतीचा सल्ला, तरी फलंदाजी

। मँचेस्टर ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंत इंग्लंडविरुद्ध मँचेस्टर येथे सुरू असलेल्या चौथ्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी फलंदाजीसाठी मैदानावर उतरला. त्याने अर्धशतकी खेळी केल्याने भारताला पहिल्या डावात ३५८ धावांपर्यंत मजल मारता आली.**



भारताचा तारांकित यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतमधील धाडस पुन्हा एकदा दिसून आले. पायाला फ्रॅक्चर असल्याने डॉक्टरांनी सहा आठवडे विश्रांतीचा सल्ला देऊनही भारतीय संघाला 'गरज' असल्याने लढवय्या पंत इंग्लंडविरुद्ध मँचेस्टर येथे सुरू असलेल्या चौथ्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी फलंदाजीसाठी मैदानावर उतरला. त्याने अर्धशतकी खेळी केल्याने भारताला पहिल्या डावात ३५८ धावांपर्यंत मजल मारता आली.

कसोटीच्या पहिल्या दिवशी फलंदाजी करताना पंतला दुखापत झाली. वेगवान गोलंदाज ख्रिस वोक्सने टाकलेल्या चेंडूवर पंतने 'रीव्हर्स स्वीप'चा फटका मारण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यात त्याला यश आले नाही. बॅटची कड घेऊन चेंडू पंतच्या उजव्या पावलावर आदळला. त्या वेळी त्याला बऱ्याच वेदना झाल्या. त्यानंतर फिजिओ आणि भारताच्या राखीव फळीतील खेळाडूंच्या साहाय्याने पंतने बूट काढला. त्याच्या पायाला सूज आल्याचे आणि त्यातून रक्तही येत असल्याचे दिसून आले. त्यानंतर विशेष 'बग्गी'च्या साहाय्याने त्याला मैदानाबाहेर नेण्यात आले. त्याच्या चाचण्या करण्यात आल्या. यात त्याच्या पावलाला फ्रॅक्चर असल्याचे निष्पन्न झाले. डॉक्टरांनी त्याला सहा आठवडे विश्रांतीचा सल्लाही दिला. मात्र, त्यानंतरही दुसऱ्या दिवशी तो फलंदाजीसाठी आला.

पहिल्या दिवसअखेर नाबाद असणाऱ्या रवींद्र जडेजा (२०) आणि शार्दूल ठाकूर (४१) यांना भारताने दुसऱ्या दिवशी पहिल्याच सत्रात गमावले. शार्दूल बाद होण्यापूर्वी 'बीसीसीआय'ने 'एक्स'वरून पंतबाबत माहिती दिली होती. ''पंतच्या उजव्या पायाला दुखापत झाली आहे. त्यामुळे तो या कसोटीत यष्टिरक्षण करणार नाही. त्याच्या जागी ध्रुव जुरेल ही जबाबदारी सांभाळेल. मात्र दुखापतीनंतरही पंत भारतीय संघाबरोबर मैदानात आला असून गरज भासल्यास तो फलंदाजी करेल,'' असे 'बीसीसीआय'ने नमूद केले होते.

### इशानही जायबंदी, जगदीशनला संधी?

– पंतने सध्या सुरू असलेल्या कसोटीत फलंदाजी केली असली, तरी तो पुढील सामन्याला मुकणार हे निश्चित आहे. त्याच्या अनुपस्थितीत ध्रुव जुरेलला अंतिम ११ खेळाडूंत स्थान मिळेल.

– राखीव यष्टिरक्षक-फलंदाज म्हणून इशान किशनला संधी मिळणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले होते. मात्र, किशनही पूर्णपणे तंदुरुस्त नसल्याची माहिती निवड समितीला देण्यात आली. तो सध्या घोट्याच्या दुखपतीतून सावरत आहे.

– पंतपाठोपाठ किशनही जायबंदी असल्याने अखेर निवड समितीने तमिळनाडूचा २९ वर्षीय यष्टिरक्षक-फलंदाज एन. जगदीशनला इंग्लंडला पाठविण्याचा निर्णय घेतला आहे.

– जगदीशनने आतापर्यंत ५२ प्रथमश्रेणी सामने खेळले असून ४७.५०च्या सरासरीने ३३७३ धावा केल्या आहेत. यात १० शतके आणि १४ अर्धशतकांचा समावेश आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। शुक्रवार ।
। दि. 25 जुलै 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## समाजातील प्रत्येक घटकाचा सन्मान

# हीच शिवसेनेची ओळख - सुलभा उबाळे

### विश्वजीत श्रीरंग बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजसेवेचा अनोखा उपक्रम!



**। बालेवाडी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**समाजातील प्रत्येक घटकाचा सन्मान राखणे ,प्रत्येक वंचित घटकाच्या मदतीसाठी धावून जाणे ही शिवसेनेची खरी ओळख आहे. या माध्यमातून कायमच ज्येष्ठ नागरिक, सफाई कर्मचारी यांचा आदर राखला आहे. त्यांच्या न्यायासाठी संघर्ष करत रस्त्यावर देखील उतरलो. हीच खरी समाजसेवा मानली आणि जपली असे शिवसेनेच्या उपनेत्या सुलभा उबाळे म्हणाल्या.**

पश्चिम महाराष्ट्र युवासेना सचिव विश्वजीत श्रीरंग बारणे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्र. १३ यमुनानगर येथील जेष्ठ नागरिक, सफाई कर्मचारी महिला भगिनी यांचा सत्कार आज (दि.24) करण्यात आला. त्यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुलभा उबाळे बोलत होत्या. उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन युवासेना - पुणे जिल्हा (शिरूर लोकसभा) अध्यक्ष अजिंक्य रामभाऊ उबाळे यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रभागातील ज्येष्ठ नागरिक, शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानिमित्ताने छत्री वाटप करण्यात आले.

सुलभा उबाळे पुढे म्हणाल्या शिवसेना ही सर्वसामान्य जनतेसाठी झटणारी आहे. कोणत्याही वंचित घटकावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी शिवसेना रस्त्यावर देखील उतरायला मागे हटत नाही. त्यामुळे प्रत्येकाचा विश्वास शिवसेने सोबत आहे. हाच विश्वास कायम ठेवत पुढील काळात काम करायचे असल्याचे उबाळे यांनी स्पष्ट केले.

Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046

# संत साई शाळेत 'स्टडी स्ट्रेस असेसमेंट टेस्ट'चा यशस्वी उपक्रम

## विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी संत साई शाळा व मनशक्ती प्रयोग केंद्र यांचा संयुक्त उपक्रम

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विद्यार्थ्यांच्या अभ्यासजन्य ताणाचे मूल्यमापन करून त्यांना योग्य दिशा देण्यासाठी संत साई इंग्लिश मीडियम हायस्कूल, भोसरी आणि मनशक्ती प्रयोग केंद्र, लोणावळा यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'स्टडी स्ट्रेस असेसमेंट टेस्ट' आयोजित करण्यात आली.**







या चाचणीमध्ये विद्यार्थ्यांचा मेंदू आणि मन यांवर अभ्यास करताना होणाऱ्या ताणाचा, चंचलतेचा, एकाग्रतेच्या अभावाचा, निर्णय क्षमतेच्या मर्यादेचा सखोल अभ्यास करण्यात आला. रंग, आकृती, अक्षरे, अंक यांच्यावर आधारित चाचण्या आणि विशिष्ट यंत्राद्वारे मेंदूची कार्यक्षमता तपासण्यात आली.

यामध्ये विद्यार्थ्यांबरोबर त्यांच्या पालकांचाही सक्रिय सहभाग होता. विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थितीवर आधारित संगणकीय निकाल तयार करून मनशक्ती केंद्रातील तज्ज्ञ साधकांनी वैयक्तिकरित्या मार्गदर्शन केले. एकाग्रता, सकारात्मकता, वाचनाची सवय, आणि कृतज्ञता यांसारख्या गुणांचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. यासाठी विशेष पुस्तके आणि ध्यानवर्धक वस्तूंची सुविधा सशुल्क उपलब्ध करून देण्यात आली. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा अभंग "मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे आगर" याची प्रचिती या उपक्रमातून आली. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. शिवलिंगजी ढवळेश्वर, सौ. सुनिता ढवळेश्वर मॅडम, संचालिका पायल ढवळेश्वर मॅडम, सौ. भारती ढवळेश्वर, श्री. मनोज वाबळे सर, तसेच मनशक्ती प्रयोग केंद्र, लोणावळा येथील श्री. अजित फापाळे, श्री. गीतेश कुलकर्णी, सौ. क्रांती गुधाटे, श्री. सतीश तोडमल, श्री प्रमोद अनिल शिंदे यांचे विशेष सहकार्य लाभले.

### "जन्मदाते हो, संस्कारदाते व्हा"...

या उपक्रमांतर्गत पालकांना त्यांच्या मुलांच्या दिनचर्येविषयी माहिती विचारून समुपदेशन करण्यात आले. स्थिर मन ही यशाची गुरुकिल्ली आहे, हे सांगत विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी मानसिकदृष्ट्या सशक्त बनवण्यावर भर देण्यात आला. संत साई इंग्लिश मीडियम हायस्कूल हे केवळ ज्ञानदानाचे नव्हे, तर संस्कारांचेही केंद्र असून, "जागो पालक जागो", "जन्मदाते हो, संस्कारदाते व्हा", "SAVE YOUR CHILD FROM YOURSELF" अशा घोषणांतून पालकांना सजग केले जात आहे.

KAMALA Education Society
KES'S PRATIBHA GROUP OF INSTITUTES'
PRATIBHA COLLEGE OF COMMERCE & COMPUTER STUDIES
ACCREDIATED WITH GRADE A NAAC
Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University
ADMISSIONS OPEN FOR THE YEAR 2025-26
UG & PG Courses in Arts, Commerce, Science, Computer Science & Management

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| B.A. English/ Economics/ Psychology | B.Com. Regular | B.Com. Business Management | B.Com. International Business | B.Com. Computer Application | B.Sc. Chemistry | B.Sc. Statistics |
| B.Sc. Cyber Security | B.Sc. Computer Science | B.Sc. Computer Application | B.Sc. Data Science | B.Sc. Information Technology | | M.Com |
| B.Sc. Cyber & Digital Sci. | | B.Sc. Nano Sci. & Nano Tech. | | B.Sc. AI & Machine Learning | | PH.D. Commerce & Management |
| M.Sc. Cyber Security | M.Sc. Data Science | M.Sc. Computer Science | M.Sc. Computer Application | M.Sc. Statistics/ Organic Chemistry | M.A. English/ Psychology | PH.D. English |

Eligibility: For Under Graduation : Passed 12th (HSC) | for Post Graduation: Graduation in respective field
For Admission Enquiry Call : 8600189162, Timings: 9 am to 5 pm
Campus: Block D-III, Plot No. 3, Behind Mehta Hospital, Old Mumbai Pune Highway, Kalbhor Nagar, Chinchwad, Pune 19
For more details please visit us at: www.pcccs.org.in